**<u>अत्यंत तातडीचे</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी – ४११०१८
क्र.मातवि/ ०४/कावि/ १६५ /२०२२
दिनांक-२५ /०५ /२०२२

**विषय:-** मनपा संकेतस्थळावर माहिती अधिकार २००५ आलेल्या अर्जाची माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेबाबत ...

**संदर्भ;-** श्री. बी.एस.पाटील यांचा आपले सरकार वरील Dept/MNPN/२०२२/२३८६७ दि.०६.०४.२०२२ रोजीच्या तक्रारीबाबत

**परिपत्रक,**

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये श्री.बी.एस.पाटील यांनी महानगरपालिका संकेतस्थळावर मुख्य पृष्ठावरील माहिती अधिकार २००५ अंतर्गत विभागांची माहिती मध्ये नागरिकांकडुन माहिती अधिकार २००५ अंतर्गत प्राप्त अर्ज व सदर अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अपलोड केल्याचे दिसून येत नसल्याबाबत तक्रार आपले सरकार या पोर्टलवर दाखल केलेली आहे.

याबाबत इकडील विभागामार्फत वारंवार परिपत्रक निर्गत करून सूचना देणेत आलेल्या आहेत. तथापि सदर माहिती अद्ययावत नसल्याचे माझे निदर्शनास येत आहे. **तरी सदर परिपत्रकान्वये सर्व संबंधित विभागांना सुचित करणेत येते की उपरोक्त नमुद केलेली माहिती अधिकार अंतर्गत विभागामध्ये प्राप्त झालेल्या अर्जाबाबतची माहिती खालिल दिलेल्या नमुन्या मध्ये तयार करून मनपा संकेतस्थळावर तातडीने अपलोड करण्यात यावी.**

| नागरिकांकडून दाखल झालेले माहिती अधिकारतील अर्ज | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **प्राप्त अर्ज** | **निरस्त अर्ज** | **शिल्लक अर्ज** |
| | | | |

तसेच सदरची माहिती अपलोड / अपडेट करणेकामी सर्व संबंधित विभागांना प्रशिक्षण देऊन लॉगिन, पासवर्ड यापुर्वीच देणेत आलेले आहेत. तथापि सदरबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास पुनश्च: माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे संपर्क साधुन प्रशिक्षण घेऊन उपरोक्त माहिती त्वरित प्रसिद्ध / अद्ययावत करणेत यावी.

तसेच सर्व संबंधित विभागांनी आपले विभागाशी संबंधित मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली सर्व माहिती (उदा. निविदा, कोटेशन, कामाचे आदेश,करारनामा, अंतर्गत परिपत्रके, RTI अंतर्गत कलम-4 नुसार प्रसिद्ध करावयाची माहिती, विभागाशी संबंधित प्रसिद्ध करणेत आलेली विविध माहिती ) तपासुन त्यामध्ये काही बदल असल्यास त्वरित बदल करुन माहिती प्रसिद्ध / अद्ययावत करणेत यावी व मनपा संकेतस्थळावरील सर्व माहिती अद्ययावत राहील याची दक्षता घ्यावी.

**(राजेश पाटील)**
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

प्रति,
सर्व संबंधित विभाग,